माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.४९६ / २३ /अ.क्र.८८१८/२५

श्री.राजेंद्सिंहजी छाजछिडक

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सआक)**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग १ ला मजला, मंत्रालय विस्तार,
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग १ ला मजला, मंत्रालय विस्तार,
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०६.२०२२ | -- | १४.०७.२०२२ | ०७.१०.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी श्री.राजेंद्रसिंह छाडछिडक यांनी आज झालेल्या सुनावणीत लाड समितीच्या शिफारशीनुसार त्यांच्याच स्वेच्छा सेवा निवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या जागी त्यांचा वारस मुलगा श्री.निखिल राजेंद्र छाडछिडक यांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत केलेल्या विनंतीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली असता यात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन झालेल्या कार्यवाहीचा तपशील हा या आधीच सादर करण्यात आलेला असून तत्कालिन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यांना या संदर्भात या आधीच निर्देश दिले असून उपरोक्त निर्देशानुसार तसेच अपिलीय अधिकारी यांच्या आदेशांवर दि.२१.११.२०२२ रोजी अपिलार्थींच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती आदेश देण्याबाबत अनुपालन झाले असल्याचे कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग श्री.अजय पवार यांनी विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात आले असून प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थींच्या म्हणण्यानुसार या नियुक्ती प्रक्रियेत झालेला विलंब तब्बल चार वर्षांचा असून याबाबत योग्य ते निर्देश जारी करावे.

उपरोक्त बाब ही माहिती अधिकार अधिनियमाच्या कार्यकक्षेबाहेर असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेवून तसेच सादर केलेले **जोडपत्र अ व ब** यावर तत्कालिन जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता द्वितीय अपिल अर्जात नमूद विषयावर या आधीच प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**

State Information Commission
Maharashtra